# समृध्दी को-ऑप. बँक लि., नागपूर

मुख्य कार्यालय : २२ अ, वंजारी नगर, नागपूर -३. फोन : ०७१२-२७०२३२२
फॅक्स क्र. : ०७१२-२७०२३२३ ई-मेल : info@samruddhibank.com

## २३ वा वार्षिक अहवाल

UPI NACH RTGS (REAL TIME GROSS SETTLEMENT) NEFT (NATIONAL ELECTRONIC FUND TRANSFER) RuPay BHIM

### वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना

(केवळ सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सन्माननिय सभासदांना कळविण्यात येते की कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव विचारात घेता बँकेची वर्षिक सर्वसाधारण सभा **गुरुवार दि. ३०/०९/२०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता आभासी (Virtual)** माध्यमाने **(https://samruddhiagm.meeting.net.in)** या सांकेतिक स्थळावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सन्माननिय सभासद बंधू-भगिनिंनी सदर सभेला ऑनलाईन उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### ।। सभेपुढील विषयसुची ।।

१. बँकेच्या दि. ०९.०२.२०२१ रोजी झालेल्या बाविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या २३ व्या वार्षिक अहवालावर विचार करणे व त्याला स्विकृती देणे.
३. दि. ३१.०३.२०२१ अखेरचा लेखापरिक्षीत ताळेबंद व सन २०२०-२०२१ या वर्षाचे नफातोटा पत्रकावर विचार करणे व त्याला मंजूरी देणे.
४. सन २०२०-२१ या वर्षाचे अंदाजपत्रकापेक्षा जास्त/कमी झालेल्या खर्चास व सन २०२१-२२ या वर्षाचे अंदाजपत्रकास स्विकृती देणे.
५. सन २०२०-२१ या वर्षाच्या अंकेक्षण अहवालावर विचार करणे व सन २०१९-२० च्या अंकेक्षण दोष दुरुस्ती अहवालाला मंजूरी देणे.
६. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकाच्या (Statutory Auditor) नियुक्तीची नोंद घेणे.
७. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
८. मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर उपस्थित होणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

नागपूर
दि. ०९/०९/२०२१

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
**(अमित प्र. राजकारणे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

### ।। विशेष सुचना ।।

१. गणसंख्या (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा अर्ध्या तासानंतर त्याचदिवशी त्याचठिकाणी घेण्यात येईल व त्यासभेला गणपूर्तीचे (कोरम) बंधन राहणार नाही.
२. सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील तर ते त्यांनी लिखीत स्वरुपात बँकेच्या वंजारीनगर येथील मुख्य कार्यालयात दि. २३/०९/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत दयावेत. वेळेवर उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देणे बँकेला बंधनकारक राहणार नाही.

### ।। बँकेच्या सभासदांना नम्र सुचना ।।

१) आपला पोस्टाचा पत्ता बदलला असेल तर त्याची माहिती बँकेला त्वरीत कळवावी.

२) आपले सर्व आर्थिक व्यवहार आपल्या जवळच्या समृध्दी बँकेच्या शाखेशीच करा व आपल्या निकटवर्तियांनाही तसे करण्यास प्रवृत्त करा.

३) बँकेशी असलेल्या आपल्या व्यवहारात नियमितपणा राखा. ते बँकेच्या व आपल्या हिताचे आहे. आपल्या सहकार्यावरच बँकेचा विकास व आर्थिक प्रगती अवलंबून आहे.

४) बँकेच्या मुख्य कार्यालय व शाखांच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळा खालीलप्रमाणे आहेत.

**मुख्य कार्यालय - सकाळी ११.०० ते सांयकाळी ६.००**

शाखा वंजारीनगर - सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०
शाखा धरमपेठ - सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०
शाखा मानेवाडा - सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०
शाखा सोमलवाडा - सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०

## २३ वा वार्षिक अहवाल सन २०२०-२०२१

मा. सभासद बंधु / भगिनींनो

आपल्या बँकेची सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा आज संपन्न होत आहे. या सभेत आपण उपस्थित आहात याबद्दल संचालक मंडळाच्या वतीने मी आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करते.

### ।। श्रध्दांजली ।।

सन २०२०-२१ ह्या वर्षात स्वर्गवासी झालेल्या बँकेच्या सभासदांना, हितचिंतकांना व देशातील मान्यवरांना आम्ही आमचे बँक परिवारातर्फे विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

### गुंतवणुक

सन २०२०-२१ ह्या आर्थिक वर्षात बँकेने तरल व तरती जिंदगीमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार १८% रक्कम गुंतवणूक करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात विहीत निकषापेक्षा जास्तीची रक्कम तरल व तरती जिंदगीमध्ये गुंतविली आहे, हे विषेशत्वाने नमूद करावेसे वाटते.

### बँकेचे भागभांडवल व सभासद

दि. ३१/०३/२०२० रोजी बँकेची सभासद संख्या ४८२७ होती. व दि. ३१/०३/२०२१ अखेर सभासद संख्या ४९०० आहे. दि. ३१/०३/२०२० अखेर बँकेचे वसूल भागभांडवल रु. ३२२.०१ लाख होते. त्यात वाढ होऊन दि. ३१/०३/२०२१ अखेर बँकेचे एकुण वसुल भागभांडवल रु. ३३०.३८ लाख झाले आहे. ह्या आर्थिक वर्षात रु. ८.३७ लाखाने वसुल भागभांडवलात वाढ झालेली आहे. बॅकेने दि. ३१/०३/२०२२ अखेर रु. ३५०.०० लाखापर्यंत भागभांडवलात वाढ करण्याचा बँकेचा मानस आहे. बँकेने निर्धारित केलेले लक्ष साध्य करण्यासाठी बँकेचे भागभांडवल वाढीसाठी बँकेला सक्रिय सहकार्य करावे ही नम्र विनंती.

### संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेले कर्ज

सन २०२०-२१ ह्या आर्थिक वर्षात बँकेने संचालक व त्यांच्या नातेवाईकांना कोणतेही कर्जवाटप केलेले नाही. सबब बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धोरणात्मक निर्णयाचे तंतोतंत पालन केले आहे. ह्याची नोंद घ्यावी.

### ठेवी

मागील वर्षाच्या सुरवातीला म्हणजे दि. ३१/०३/२०२० अखेर बँकेजवळ रु. ८४२७.९५ लाखाच्या ठेवी होत्या. त्यात वाढ होऊन दि. ३१/०३/२०२१ अखेर बँकेजवळ रु. ९६५४.०१ लाखाच्या ठेवी जमा आहेत. मागील आर्थिक वर्षात रु. १२२६.०६ लाखाने झालेली ठेवीमधील वाढ ही सभासदांचा व ग्राहकांचा बँकेने विश्वास संपादन केला असल्याचे दयोतक आहे. असे आम्ही मानतो. ठेवीमधील वाढीचे प्रमाण हे १२.७० टक्के आहे.

### ठेव विमा

आपली बँक ठेव विम्याचे हप्ते 'डिपॉझिट इन्शुरन्स अॅड क्रेडिट गॅरन्टी कार्पोरेशन' (DICGC) ह्यांचेकडे नियमित जमा करीत आहे. पूर्वी सभासदांना त्यांचे ठेवीवर रु. १,००,०००/- लाखापर्यंतच्या ठेवीवर विमा सरंक्षण प्राप्त होते. परंतु दि. ०५ फ्रेबुवारी २०२० पासुन रु. १ लाखाएवजी सभासदांना त्यांचे ठेवीवर रु. ५,००,०००/- पर्यंतच्या सर्व ठेविदारांना त्यांच्या ठेवीवर विमा सरंक्षण प्राप्त झालेले आहे. ही निश्चितच समाधानाची बाब आहे. यामुळे सभासदांच्या ठेवी अधिक सुरक्षित झाल्या आहेत.

### भागभांडवल पर्याप्तता प्रमाण (Capital Adequacy Ratio)

भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार कमीतकमी ९% असणे आवश्यक आहे. २०२०-२१ ह्या वर्षी हे प्रमाण १२.३७% आहे. भांडवल पर्याप्तता ही आपल्या बँकेच्या आर्थिक स्थैर्याचे व विकासाचे प्रतिक आहे हे सांगण्यास मला आनंद वाटतो.

### थकबाकी

बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीने थकित कर्ज वसुलीचा प्रश्न बँकेचे सतत ऐरणीवर असतो. थकित कर्ज सभासदांनी COVID 19 मुळे वसुलीकरीता यावर्षी अनुकूल प्रतिसाद न दिल्याने बँकेचे ग्रॉस एन. पी. ए. चे ७% पेक्षा कमीचे लक्ष्य बँकेला साध्य करता आले नाही. ही अतिशय चिंताजनक बाब आहे. COVID 19 मुळे सर्व प्रकारच्या व्यवसायांवर विपरित परिणाम झाल्याने त्याचा प्रभाव बँकेच्या थकित कर्ज वसुलीवर झाला आहे.

हळूहळू व्यापार उद्यम सुरळीत होत आहे. त्यामुळे यापुढे थकित कर्जदार सभासद बँकेच्या कर्जवसुलीकरीता सक्रीय सहकार्य करतील व त्यांचेकडील थकित कर्जबाकी सत्वर बँकेत जमा करतील व स्वत:ची सर्व कर्जखाती नियमित ठेवतील अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

**ATM :** बँकेने शाखा सोमलवाडा येथे बँकेचे एटीएम सुरु आहे. एटीएम चे माध्यमातून ग्राहकांना Rupay, Debit Card, Mobile Banking ग्राहकांची दैनंदिन बिले BBPS तसेच UPI चे माध्यमातून विविध Apps वरील सोयी सुविधा बँकेतर्फे ग्राहकांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. यापुढे सुध्दा नवनविन सोयी ग्राहकांना उपलब्ध करुन देण्याबाबत बँक प्रयत्नशील आहे.

**आवाहन :** आजच्या स्पर्धेच्या युगात नागरी सहकारी बँकासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. उत्पन्नाचे स्त्रोत कमी होत आहेत व खर्चाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. Corona Virus मुळे देशाची तसेच बँकाचीही अवस्था बिकट झालेली आहे. त्यामुळे देशातील सर्वच आर्थिक व्यवहार ठप्प झाले होते. आता हळूहळू सगळी अर्थव्यवस्था रुळावर येण्याकरीता धडपडत आहे. आर्थिक परिस्थिती सुधारायला बराच कालावधी लागणार आहे अश्या विपरीत परिस्थितीत बँकींग क्षेत्रापुढे बरीच आव्हाने उभी ठाकलेली आहेत. बँकिंग क्षेत्रापुढे असणाऱ्या या आव्हानांना आपण सामोरे जाऊन दिवसेंदिवस प्रगती करीत आहोत. ही समाधानाची बाब आहे. सर्व कायदे, नियम यांचे काटेकोरपणे पालन करणे अत्यंत गरजेचे आहे.

ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी बँक सतत नवनविन संकल्पना व्यवहारात आणित आहेत. बँकेचे अधिकारी व पदाधिकारी बँकेच्या प्रगतीकरीता सातत्याने परिश्रम घेत आहेत. यात आपलाही सक्रीय सहभाग बँकेला लाभावा अशी प्रार्थना आहे.

**कर्मचारी प्रशिक्षण :** बँकेच्या प्रगतीमध्ये कर्मचारी व अधिकारी वर्गाचा सक्रिय सहभाग आत्यंतिक महत्वाचा आहे. बँकेने वेळोवेळी बहुतांश कर्मचारी व अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. बँकिंग क्षेत्रात झालेल्या आमुलाग्र बदलामुळे अपेक्षित कौशल्य व विशेष ज्ञान प्राप्त करण्याचे दृष्टीने कर्मचारी व अधिकारी यांना गरजेनुसार वेळोवेळी प्रशिक्षणास पाठविण्यात येत आहे Covid-19 असल्याने सध्यास्थितीत बँकेतील कर्मचारी व अधिकारी Online प्रशिक्षण घेत आहेत. ही प्रक्रिया सातत्याने सुरु आहे व भविष्यातही सुरु राहील याची मी हमी देते.

**सतत व समवर्ती लेखापरिक्षण :** आपल्या बँकेच्या व्यवहारात पारदर्शकता व अचुकता यावी व ग्राहकांचे हितसंबंध जोपासले जावे यासाठी सतत व समवर्ती लेखापरिक्षण सनदी लेखापाल यांचे कडून होत आहे. शाखेचा व्यवहार विचारात घेऊन मासीक / त्रैमासीक पध्दतिने लेखापरिक्षण करण्यात येत आहे. लेखापरिक्षकाने वेळोवेळी केलेल्या सुचनांचे आधारे कामकाजात आवश्यक सुधारणा करुन ग्राहकांना तत्पर व अचूक सेवा देण्यास आम्ही सतत तत्पर आहोत.

**आभार :** या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्याने आपणाशी संपर्क साधण्याची संधी मिळाली याबद्दल बँकेचे भागधारक, सभासद, ठेवीदार, हितचिंतक ह्यांची मी मन:पूर्वक आभारी आहे. बँकेच्या वाटचालीमध्ये अनेक संस्था, व्यक्तिंचे मोलाचे सहकार्य बँकेला लाभले आहे. रिझर्व्ह बँकेचे मा. महाप्रबंधक, मा. उपमहाप्रबंधक व त्यांचे अधिकारी, मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व त्यांचे अधिकारी, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व त्यांचे अधिकारी, राज्य सहकारी बँक व त्यांचे अधिकारी, सहकारी पतसंस्था, महाराष्ट्र राज्य को-ऑप. बँक, फेडरेशन महाराष्ट्र राज्य को-ऑप. बँक, असोसिएशन तसेच बँकेचे शुभचिंतक, हितचिंतक, मार्गदर्शक, बँकेचे कायदे सल्लागार, व्हॅल्युअर्स तसेच बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी अशा सर्वांचेच बहुमोल सहकार्य बँकेला वेळोवेळी मिळालेले आहे. तसेच विविध वृत्तपत्रे, नियतकालीके, प्रसिध्दी माध्यमांचे आपल्याला नेहमीच सहकार्य लाभत आहे. या सर्वांचेच मी संचालक मंडळाचे वतीने अतिशय आभारी आहे. संस्थेच्या प्रगतीकरीता हया पुढील काळातही आपले असेच सहकार्य लाभेल असा विश्वास बाळगते.

**समारोप :** वरीलप्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा अहवाल आपल्यासमोर सादर केलेला आहे. सदर अहवाल तसेच दि. ३१.०३.२०२१ अखेरचा ताळेबंद व आर्थिक पत्रके तसेच सभेपुढील चर्चेसाठी येणाऱ्या विषयास आपण मंजूरी दयावी अशी मी आपणास संचालक मंडळाचे वतीने विनंती करते. बँकेच्या ग्राहकांना, भागधारकांना, हितचिंतकांना व खातेधारकांना Covid-19 मुळे झालेली आर्थिक, मानसिक तसेच शारिरीक हानी भरुन काढून चालू आर्थिक वर्ष आरोग्यपूर्ण भरभराटीचे व सुखसमृध्दीचे जावो ही सदिच्छा व्यक्त करते. परमपुज्य दादाजी धुनिवाले महाराजांचे चरणी बँकेच्या पुढील प्रगतीसाठी विनम्रपणे प्रार्थना करुन वार्षिक अहवालाला येथेच पूर्ण विराम देते.

।। जय सहकार ।।
धन्यवाद !

नागपूर

दि. ०९/०९/२०२१

संचालक मंडळाच्या वतीने
**(कांचन नि. गडकरी)**
अध्यक्षा
समृध्दी को-ऑप. बँक लि. नागपूर,

## विद्यमान संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| सौ. कांचन नितीन गडकरी | - | अध्यक्षा |
| श्री. विनोद रामकृष्ण लिमसे | - | उपाध्यक्ष |
| श्री. दिलिप कृष्णराव मुलमुले | - | तज्ञ संचालक |
| श्री. राजेश कमलाकर लोखंडे | - | संचालक |
| श्री. गजानन पांडूरंग शेळके | - | संचालक |
| श्री. सचिन वसंतराव नारळे | - | संचालक |
| श्री. शाम लक्ष्मीकांत कुरोडे | - | तज्ञ संचालक |
| श्री. वामन देवराव तुर्के | - | संचालक |
| सौ. उर्मिला प्रदिप सराफ | - | संचालिका |
| सौ. ज्योती अभिजीत फडणविस | - | संचालिका |
| सौ. विजया शंकरराव गद्रे | - | संचालिका |
| सौ. मधुरा सारंग गडकरी | - | संचालिका |
| सौ. जयश्री रविकिरण वटे | - | स्विकृत संचालिका |

## परिशिष्ट - अ

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नांव | : | समृध्दी को-ऑप. बँक लि. नागपूर |
| मुख्य कार्यालय | : | २२-अ, वंजारीनगर, नागपूर |
| नोंदणी दिनांक | : | १६.०४.१९९८ |
| आर.बी.आय. लायसन्स | : | युबीडी /एम. ए. एच. / १७३५ पी |
| व दिनांक | : | दिनांक १२.०७.१९९९ |
| शाखा व मुख्य कार्यालय | : | ४ शाखा व मुख्य कार्यालय |
| कार्यक्षेत्र | : | नागपूर जिल्हा |
| सभासद | : | ४९०० |
| वसुल भागभांडवल | : | ३३०.३८ लाख |
| राखीव व ईतर निधी | : | ५७०.०२ लाख |
| ठेवी | : | ९६५४.०१ लाख |
| कर्जे | : | ४३८५.१० लाख |
| अल्पमुदत | : | १७७०.०६ लाख |
| मध्यममुदत | : | १३६९.०२ लाख |
| दिर्घमुदत | : | १२४६.०२ लाख |
| बाहेरील कर्ज | : | निरंक |
| गुंतवणूक | : | २५६०.५४ लाख |
| सी. आर. ए. आर. | : | १२.३७ % |
| नेट एन.पी.ए. | : | ११.३९ % |
| ग्रॉस एन.पी.ए. | : | १४.८७ % |
| खेळते भांडवल | : | १०६९६.२५ लाख |
| कर्मचारी संख्या | : | ४४ |

## INDEPENDENT AUDITOR'S REPORT
## FOR THE YEAR ENDED 31ST MARCH, 2021

(Under Section 31 of the Banking Regulation Act, 1949 and as applicable to Urban Cooperative Banks and U/S 81(5)(B) of Maharashtra State Co-operative Societies Act, 1960)

**TO,**
**THE MEMBERS,**
**SAMRUDDHI CO-OPERATIVE BANK LTD, NAGPUR.**
**Report On Financial Statements -**

1. We have audited the attached Balance Sheet of The SAMRUDDHI CO-OPERATIVE BANK LTD, NAGPUR as at 31st March 2021, and The Profit and Loss Account for the year ended on that date and a summary of significant accounting policies and other explanatory information and the

   Cash Flow Statement as on that date, incorporated in these financial statements along with all the 4 branches audited by us for period 01/04/2020 to 31/03/2021.

**Management's Responsibility for the Financial Statements –**

2. Management is responsible for the preparation of these financial statements in accordance with Maharashtra State Co-operative Societies Act 1960, Banking Regulation Act, 1949, circulars and guidelines issued by the Reserve Bank of India (RBI) from time to time and recognized accounting policies and practices, including the Accounting Standards issued by the Institute of Chartered Accountants of India [ICAI]. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatements, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility –**

3. Our responsibility is to express an opinion on these MCS ACT statements based on our audit. We conducted our audit in accordance with "Standards on Auditing" issued by the "Institute of Chartered Accountants of India" and MCS ACT, BR ACT and RBI Guidelines. Those standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements, whether due to fraud or error.

   An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on auditor's judgment, including the assessment of the risk of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.
   We believe that audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

4. **Emphasis of Matters -**
   Without qualifying our opinion, we bring to your attention the following:
   Accounting of certain items like locker rent, dividend on Investment, commission on guarantees, incidental charges, service charges & processing fees is done in the year of receipt, thereby deviating the principles of the Accounting Standard 9 on "Revenue Recognition" according to which income relating to current year should be recognized on accrual basis, if there is no uncertainty regarding the ultimate collectability and measurability.

**Opinion –**
**5. We have observed that –**
- **Subject to impact on profitability due to serious irregularities mentioned in Part "A" of the Audit report.**

Subject to our observations above, in our opinion as shown by the books of the bank, and to the best of our information and according to the explanations given to us:

i. The balance sheet, read with the notes thereon is a full and fair Balance Sheet containing all the necessary particulars, is properly drawn up so as to exhibit a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st March, 2021 in conformity with accounting principles generally accepted in India;

ii. The Profit and Loss Account, read with the notes thereon shows a true balance of Profit, in conformity with the accounting principles generally accepted in India, for the year covered by the Audit; and

iii. In the case of cash flow statement, of the cash flows for the year ended on that date.

**Report on Other Legal & Regulatory Requirements**

6. The Balance Sheet and Profit & Loss Account have been drawn up in accordance with the provisions of section29 of Banking Regulation Act,1949 read provision of MSC Act,1960 and MCS Rules,1961 (Forms 'A' and 'B' respectively of the Third Schedule to the Banking Regulation Act, 1949).

7. We report that,
   As required by the Maharashtra State Co-operative Societies Act,1960 and Banking Regulation Act 1949 and also subject to the limitations of disclosure required therein, we report that:
   a. We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief, were necessary for the purposes of our audit and have found them to be satisfactory.
   b. The transactions of the Bank, which have come to our notice, have been within the power of the Bank.
   c. The transactions of the Bank, which have come to our notice have been, in our opinion, within the powers of the Bank except as mentioned in the Head Office Memorandum and Serious irregularities forming part of Head Office Memorandum.

8. The details as required by the Rule 69(6) of Maharashtra Co-operative Societies Rules 1961 are given in the audit memorandum.

9. In our opinion, the Balance Sheet, Profit and Loss Account comply with the applicable Accounting Standards subject to those mentioned above.

10. The appointment of Auditor is made by Bank Management under Maharashtra State Co-operative Societies Act 1960.

11. We further report that,
    i. The Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account.
    ii. In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books.
    iii. The reports on the accounts of the branches audited by us have been dealt with in preparing our report in the manner considered necessary by us.
    The Bank has been awarded "B" Audit Classification for the financial year 2020-2021.

**T. P. DABLE**
(PROPRIETOR)
FIRM REG. NO. 115398W
MEMERSHIP NO: 049449
Audit Panel Number-12646
UDIN: -21049449AAAADZ8743

**Place :** Nagpur
**Date :** 10.09.2021

**For T.P. DABLE & CO.**
Chartered Accountants

# समृध्दी को ऑपरेटिव्ह बँक लि., नागपूर

## नफा—तोटा पत्रक दि. ०१.०४.२०२० ते दि. ३१.०३.२०२१ करिता

| रक्कम दि. ३१.०३.२०२० | खर्च | | रक्कम दि. ३१.०३.२०२१ |
|---|---|---|---|
| ५,६९,४८,६६५.५० | ठेवीवर दिलेले व्याज | | ६,०४,३३,२६१.०० |
| **१,०७,८२,७०८.००** | **पगार भ.नि.निधी योगदान** | | **१,२०,८२,५२२.००** |
| ८६,२५०.०० | संचालक मंडळ बैठक भत्ता | | ६०,७५०.०० |
| १,२२,५००.०० | अंकेक्षण शुल्क | | ८,४६,०७०.०० |
| **२७,६०,११५.००** | **भाडेकर, विमा, विज** | | **३७,५४,०६३.००** |
| | भाडे | ११,९७,११६.०० | |
| | कर | ५,६३,६३८.०० | |
| | वीज | ३,७८,००१.०० | |
| | पाणी | ७२,५३८.०० | |
| | डि.आय.सी.जी.सी.इन्सुरन्स | १२,४२,६०५.०० | |
| | इन्सुरन्स | ३,००,१६५.०० | |
| **३,५५,३७२.३०** | **टपाल व टेलीफोन** | | **४,८८,७६४.९३** |
| | टपाल | १२,०२१.०० | |
| | टेलीफोन | ४,७६,७४३.९३ | |
| **११,७५,६२३.९६** | **छपाई व लेखनसामग्री व जाहिरात** | | **५,५२,८४९.४६** |
| | छपाई व लेखनसामग्री | ४,०१,३३९.५० | |
| | जाहीरात | १,११,०७०.९६ | |
| | स्टेशनरी | ४०,४३९.०० | |
| **२०,१५,१४४.००** | **झीज** | | **१८,२२,८२४.०४** |
| | इमारत | ५३,५००.०० | |
| | वाहन | १,४७,७७०.०० | |
| | फर्निचर | २,३०,६८८.१० | |
| | कॉम्प्युटर | १३,९०,८६५.९४ | |
| **१,५७,२९,८७६.६२** | **इतर खर्च** | | **४८,७१,०२०.८४** |
| | ए.टी.एम. चार्जेस | ४,५६,७२५.४० | |
| | इन्कम टॅक्स | — | |
| | आमसभा खर्च | १,१३,०७५.०० | |
| | दुरुस्ती व मेन्टेनन्स | १०,३६,०४९.५४ | |
| | बॅंक चार्जेस | ६३,८०१.३८ | |
| | बिजनेस प्रमोशन | — | |
| | कार्यालयीन खर्च | ३,३०,१९९.४० | |
| | किरकोळ खर्च | ५,००,७८५.७३ | |
| | बुडित व संशयित कर्ज तरतुद | — | |
| | साधारण कर्जावरील तरतुद | — | |
| | एस.एम.एस. चार्जेस | १०,३१,९४७.३२ | |
| | सर्टिफिकेशन फी | ८८१९०.१४ | |
| | मेडीक्लेम | ५,८६,१०२.०० | |
| | पेट्रोल | १,५८,०४७.८५ | |
| | ग्रॅज्युईटी तरतुद | — | |
| | इन्कम टॅक्स रिजर्व | — | |
| | जी.एस.टी | ४,०१,३४१.०८ | |
| | ए. एम. सी. | ९८०००.०० | |
| ५,००,०००.०० | पूर्व कालावधी कर | ६७५६.०० | |
| —७१,०१,४५८.६७ | **नफा** | | ७,९७,५७०.९७ |
| ८,३३,७४,७९६.७१ | | | ८,५७,०९,६९६.२४ |

| रक्कम दि. ३१.०३.२०२० | उत्पन्न | | रक्कम दि. ३१.०३.२०२१ |
|---|---|---|---|
| ७,६१,७१,४६९,६२ | **प्राप्त व्याज** | | ७,४२,५२,४३६.१२ |
| | कर्जावरील व्याज | ५,१६,९६,१६९.४० | |
| | गुंतवणुकीवरील व्याज | २,२५,५६,२६६.७२ | |
| ७२,०३,३२७.०९ | **इतर उत्पन्न** | | १,१४,५७,२६०.१२ |
| | सर्व्हिस चार्जेस | ८,२९,४०३.१५ | |
| | इतर प्राप्ती | १,०६२७,८५६.९७ | |
| ८,३३,७४,७९६.७१ | | | ८,५७,०९,६९६.२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| **कांचन नि. गडकरी** | **विनोद रा. लिमसे** | **टी. पी. डबले ॲन्ड कंपनी** | **अमित प्र. राजकारणे** |
| अध्यक्षा | उपाध्यक्ष | सनदी लेखापाल, | मुख्य कार्यकारी अधिकारी |

## अंदाजपत्रक सन २०२१—२०२२

| विवरण खर्च | अंदाज २०२० — २०२१ | प्रत्यक्ष खर्च २०२०— २०२१ | अंदाज २०२१ — २०२२ |
|---|---|---|---|
| ठेवी व कर्जावर दिलेले व्याज | ६००.०० | ६०४.३३ | ६३५.०० |
| पगार भ. नि. नि. | १२०.०० | १२०.८२ | १३०.०० |
| संचालक मंडळ फी | ०.९० | ०.६१ | ०.९० |
| अंकेक्षण शुल्क वैधानिक | ४.०० | ८.४६ | ८.०० |
| भाडे, कर, विमा, व विज | ३०.०० | ३७.५४ | ३५.०० |
| टपाल, तार व टेलिफोन | ४.०० | ४.८९ | ५.०० |
| छपाई, लेखनसामुग्री व जाहीरात | १०.०० | ५.५३ | ५.०० |
| झीज | २१.०० | १८.२३ | २०.०० |
| इतर खर्च | ४०.०० | ४२.८६ | ५०.०० |
| बुडित व संशयित कर्ज निधी | १०.०० | — | १०.०० |
| आयकर तरतुद | — | — | ५.०० |
| बोनस तरतुद | — | — | ८.०० |
| मेडिक्लेम इन्सुरन्स | ५.०० | ५.८६ | ६.०० |
| ग्रॅज्युईटि तरतुद | १०.०० | ०.०० | ८.०० |
| निव्वळ नफा | २०.१० | ७.९७ | २४.१० |
| **एकूण बेरीज** | ८७५.०० | ८५७.१० | ९५०.०० |

| विवरण उत्पन्न | अंदाज २०२० — २०२१ | प्रत्यक्ष उत्पन्न २०२०— २०२१ | अंदाज २०२१ — २०२२ |
|---|---|---|---|
| कर्जावरील प्राप्त व्याज | ६१५.०० | ५१६.९६ | ६५०.०० |
| गुंतवणुकीवरील प्राप्त व्याज | १९०.०० | २२५.५६ | २००.०० |
| अन्य उत्पन्न | ७०.०० | ११४.५८ | १००.०० |
| **एकूण बेरीज** | ८७५.०० | ८५७.१० | ९५०.०० |

# समृध्दी को ऑपरेटिव्ह बँक लि., नागपूर

## ताळेबंद पत्रक दि. ३१.०३.२०२१ रोजीचे

| रक्कम दि. ३१.०३.२०२० | भांडवल व देणी | | रक्कम दि. ३१.०३.२०२१ |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भागभांडवल** | | ५,००,००,०००.०० |
| ३,२२,०१,२००.९७ | **एकुण भागभांडवल** | ३,३०,३८,०२७,५९ | ३,३०,३८,०२७,५९ |
| ५,९९,८३,९०९.७३ | **निधी** | | ५,७०,०१,६१४.६० |
| | राखीव निधी | १०८,११,८५०.९८ | |
| | इमारत निधी | २६,४८,२००.०० | |
| | बुडीत व संशयीत कर्ज निधी | १,५७,४८,४४५.३१ | |
| | साधारण कर्जावर निधी | १९,५०,०००.०० | |
| | पुर्नमुल्यांकण निधी | २,४३,८०,९२५.६१ | |
| | निवडणूक निधी | ३,७५,४१६.,०० | |
| | अनफोरसिन लॉसेस | – | |
| | बॅंक भागभांडवल तरतूद | १२,०००.०० | |
| | गुंतवणुक चढउतार निधी | १,००,०००.०० | |
| | लांभाष २०१५–१६ | – | |
| | गुंतवणुक घसारा निधी | १,०१,०००.०० | |
| | एन.डी.सी.सी.बॅंक तरतुद | ३,९३९.२५ | |
| | लांभाष २०१६–१७ | – | |
| | लांभाष २०१७–१८ | – | |
| | शिक्षण निधी | २,४०,५७०.४५ | |
| | लांभाष २०१८–१९ | ६२९,२६७.०० | |
| ८४,२७,९५,४४५.८२ | **ठेवी** | | ९६,५४,०१,२७९.३२ |
| | मुदत ठेवी | ६४,५८,९१,३०९.०० | |
| | पुर्नगुंतवणुक ठेव | ६,९४,१३,२९७,०० | |
| | बचत खाते | ११,४४,९०,०९२.०९ | |
| | चालु खाते | १०,६५,९०,४०३.२७ | |
| | आवर्त ठेव | २,५९,०५,१८८.०० | |
| | समृध्दी पूर्ती मुदत ठेव | २३,२५,१२८.०० | |
| | ओ.डी. क्रेडिट बॅलन्स | ७,८५,८६१.९६ | |
| ३५,९२१.५० | **शाखा मेळ खाते** | | –४०,६४,५६५.०० |
| २,५४,६९,२००,०० | मुदत ठेवी वर देणे व्याज तरतुद | | २,०४,५८,५१४,०० |
| ५५,०८,७६०,०० | **तरतुद** | | ४६,५६,५८४,०० |
| ४०,९३,२३३,०० | एन पी ए कर्जावरील व्याज तरतुद | ४२,४१,०५७,०० | |
| ८७,५७३.०० | प्रशिक्षणावरील तरतूद | ८७,५७३.०० | |
| २,०४,९५४.०० | शिक्षण निधी तरतुद | २,०४,९५४.०० | |
| ८,००,०००.०० | बोनस तरतुद | – | |
| – | मेडिक्लेम तरतुद | – | |
| – | ग्रॅज्युईटी तरतुद | – | |
| १,२३,०००.०० | इन्कम टॅक्स रिजर्व | १,२३,०००.०० | |
| २,००,०००.०० | इन्कम टॅक्स तरतुद | | |
| ३४,४८,४८१.५५ | **इतर देणी** | | १,०७,५९,८४८.३८ |
| – | प्रोफेशनल टॅक्स | ८,८००.०० | |
| १,६८,०००.०० | लॉकर भाडे ठेव | १,९७,०००.०० | |
| ७८,८००.०० | खर्चावरील तरतूद | ३,६०,८००.०० | |
| २,१५०.५५ | टी.डीएस | ३,५४१.५५ | |
| ३३,००३.०० | इतर देणी | २१.७०३.०० | |
| १,७५४४९.०० | टी.डीएस पेयेबल | ३,८१,४८१.०० | |
| २६,८७,१६५.०० | डी.डी. पेयेबल | २६,३८,५९८.५० | |
| २,२९,३३०.०० | शेअर्स सस्पेन्स | ६७,५००.०० | |
| – | किलअरींग सस्पेन्स | ४०,००,०००.०० | |
| ६०,५६७.०० | कर्मचारी भविष्य निधी | ६०,८०२.०० | |
| १४,०१७.०० | जीवन विमा (एल आय सी) | १२,०५१.०० | |
| | डेफ फंड पेयेबल | ३०,०७,५७१.३३ | |
| –७०,८९,१५०.३७ | **नफा** | | –६२,९१,५७९.४० |
| –७१,०१,४५८.६७ | सन २०१९–२० | –७०,८९,१५०.३७ | |
| १२,३०८.३० | मागिल वर्षाचा शिल्लक नफा | ७,९७,५७०.९७ | |
| ९६,२३,५३,७६९.२० | | | १,०८,०९,५९,७२३.४९ |

| रक्कम दि. ३१.०३.२०२० | संपत्ती व येणी | | रक्कम दि. ३१.०३.२०२१ |
|---|---|---|---|
| १,१३,१८,१११.०० | **रोख व बॅंकेतील शिल्लक** | | १,३७,२८,००२.०० |
| | हातातील रोख रक्कम | १,३३,८६,००२.०० | |
| | ए.टी.एम. रोख | ३,४२,०००.०० | |
| २९,४७,०९,९३२.८३ | **चालु खाते** | | ३२,३२,६६,९६६.९६ |
| | महाराष्ट्र राज्य सह. बॅंक | १,१०,८९,८८४.७० | |
| | महाराष्ट्र राज्य सह. बॅंक, मूंबई | १९,१३,३९८.१९ | |
| | नागपूर जिल्हा मध्य. सह. बॅंक | ३,९३९.२५ | |
| | आय डी बि. आय बॅंक | १७,५७,१२,७८७.०७ | |
| | बॅंक ऑफ महाराष्ट्र | २,००,९८,९५४.५० | |
| | भारतीय स्टेट बॅंक | ३,१५,८३,०४०.५८ | |
| | आय सी आय सी आय बॅंक | ५,२०,८२,३८०.७६ | |
| | एस बॅंक | ५,३७,८९३.१० | |
| | एच डी एफ सी बॅंक | ५,००,०००.०० | |
| | टी जे एस बी बॅंक | १,५८,९४,४३७.८१ | |
| | ईक्विटास बॅंक | १,३८,५०,२५१.०० | |
| १७,६५,३८,३८३.४९ | **गूंतवणुक** | | २५,६०,५४,०३३.४९ |
| | महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक | ५५,००,०००.०० | |
| | ट्रेझरी बिल | ९,९२,४६,१५०.०० | |
| | सरकारी रोखे | १४,६२,९५,८८३.४९ | |
| | भागखरेदी | १२,०००.०० | |
| | आय डी बि. आय बॅंक | – | |
| | इतर गुंतवणूक | ५०,००,०००.०० | |
| ४३,३०,४९,८६२.०२ | **कर्जे** | | ४३,८५,१०,२६३.४८ |
| | **अल्पमुदती कर्ज** | **१७,७०,०६,४८०.०८** | |
| | मुदती ठेव कर्ज | ७,०६,१६,१७४,०० | |
| | आवर्त ठेव कर्ज | १,३३,८०३,०० | |
| | ओव्हरड्राफट मुदत ठेव कर्ज | ३,६४,५२,०८०.४१ | |
| | किसान विकास पत्र | १,५८,५०३,०० | |
| | कॅश क्रेडीट | १,४०,३९,४४५.३७ | |
| | सिक्युअर्ड कॅश क्रेडीट | ५,४८,२३,२७४.३० | |
| | शिक्षण कर्ज | ३०,६६४.०० | |
| | शेती कर्ज | ७,२०,४६०.०० | |
| | ओडि पगार | १,५८३.०० | |
| | सोने तारण कर्ज | ३०,४९३.०० | |
| | **मध्यम मुदती कर्ज** | **१३,६९,०१,७१५.४८** | |
| | वाहन कर्ज | २,१३,४२,१३९.०० | |
| | नजरगहाण कर्ज | १०,२३,६६,९५०.४८ | |
| | वस्तुखरेदी कर्ज | – | |
| | कर्मचारी कर्ज | १३,४३,३११.०० | |
| | वैयक्तिक कर्ज | १,१८,४९,३१५.०० | |
| | **दिर्घ मुदती कर्ज** | **१२,४६,०२,०६७,९२** | |
| | घरबांधणी कर्ज | २,६७,२०,५४०.९८ | |
| | घरतारण कर्ज | ९,७८,८१,५२६.९४ | |
| ७६,८७,२४५.६७ | **येणे व्याज** | | ७४,७०,९७९.७६ |
| | सरकारी रोख्यावरील येणे व्याज | २२,६८०.५९ | |
| | गुंतवणुकीवरील व्याज | ३२,०७,२४२.१७ | |
| | एन पी ए कर्जावरील व्याज | ४२,४१,०५७.०० | |
| २,५८,४४,५६१.०० | **जमीन व इमारत** | | २,५७,५२,३३३.०० |
| | जमीन | २,००,००,०००.०० | |
| | इमारत | ५७,५२,३३३.०० | |
| २५,०४,६५३.१० | डेडस्टॉक फर्निचर | | २२,७३,९६६.०० |
| ४१,२४,१४०,०० | कॅम्पुटर | | २८,२९,२९१.०० |
| १४,७७,७०६.०० | **वाहन** | | १३,२९,९३६ |
| | मारोती व्हॅन | १,८१,८३९.०० | |
| | मारोती इको | १,४०,९३८.०० | |
| | मारोती ब्रिझा | १०,०७,१५९.०० | |
| ५०,९९,१७४.०९ | **इतर येणी** | | ९७,४३,९५१.८० |
| | प्रिंटींग स्टॉक | ५,६१,१४८.७५ | |
| | टेलिफोन डिपॉझिट | ३३,०१४.०० | |
| | इलेक्ट्रिक डिपॉझिट | ४०,८४२.०० | |
| | वॉटर डिपॉझिट | ५,०००.०० | |
| | कर्मचारी ॲडव्हान्स | २,१५,८४७.०० | |
| | पेट्रोल डिपॉझिट | १५,०००.०० | |
| | टीडीएस | १,७८,०५२.०० | |
| | सरसाई मॉर्गेज | ५,०००.०० | |
| | सरसाई फॅक्ट्रीग | ५,०००.०० | |
| | संड्री डेटर्स | ५,०००.०० | |
| | रुपे कार्ड | ३,५५,४८१.०३ | |
| | डैफड टॅक्स | ४९,१५,६५४.६० | |
| | डेफ रिसिव्हेबल | ३०,०७,५७१.३३ | |
| | जीएसटी ॲडव्हान्स | ४,०१,३४१.०९ | |
| ९६,२३,५३,७६९.२० | | | १,०८,०९,५९,७२३.४९ |

| | | | |
|---|---|---|---|
| **कांचन नि. गडकरी** | **विनोद रा. लिमसे** | **टी. पी. डबले ॲन्ड कंपनी** | **अमित प्र. राजकारणे** |
| अध्यक्षा | उपाध्यक्ष | सनदी लेखापाल, | मुख्य कार्यकारी अधिकारी |

पत्ता न मिळाल्यास खालील पत्त्यावर परत करावे

**प्रति,**

**समृध्दी को ऑपरेटिव्ह बँक लि., नागपूर**

**मुख्य कार्यालय :** २२ अ, वंजारीनगर, नागपूर.

**फोन क्रं.** २७०२३२२, २७०२३२३